**Pimpri Chinchwad Police Commissionerate**

-: **प्रेसनोट** :-

**वाकड पोलीस ठाणे हद्दित राहणारा कुप्रसिध्द राकेश भरणे टोळीतील गुन्हेगार, अनिल तुकाराम मोहिते, यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्दतेचे आदेश दिले.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दित गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासून त्यांचेवर मोका व एमपीडीए कायद्या अंतर्गत परीणामकारक कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी दिलेले असून त्याप्रमाणे कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने वाकड पोलीस ठाणेचे हद्दित लोखंडी रॉड, पिस्टल यासारखी जीवघेणी हत्यारांसह खुन, खुनाचा प्रयत्न करणे, दुःखापत करणे, बेकायदेशिर जमाव जमवुन जागेचा ताबा घेणे, दहशत माजवुन नागरिकांना वेठीस धरुन नाहक त्रास देणे, यासारखे गुन्हे करणारा कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **अनिल तुकाराम मोहिते, वय ४४ वर्षे, रा. सी. ४०१, बेला व्हिस्टा सोसायटी, दत्त मंदीरा जवळ, वाकड, पुणे**, यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश, सो, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे, येथे दिनांक २४/०२/२०२१ रोजी सदर कायद्यान्वये स्थानबध्द करण्यात आले आहे.

कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **अनिल तुकाराम मोहिते, वय ४४ वर्षे, रा. सी. ४०१, बेला व्हिस्टा सोसायटी, दत्त मंदीरा जवळ, वाकड, पुणे**, याने वाकड व पिंपरी पोलीस ठाणेचे हद्दित सन २०१३ पासून आत्तापर्यत ०५ गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याच्या गुन्हयांचा चढता आलेख पाहून तसेच मा. पोलीस आयुक्त सो. यांचे आदेशा नुसार व.पो.नि. श्री. विवेक मुगळीकर, वाकड पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा. सुहास पाटोळे यांचे पथकाने त्याचेवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई करणे कामी प्रस्ताव श्री. गणेश बिरादार, सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, श्री. आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त सो. यांचे मार्फतीने मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे सादर केला होता.

सदर प्रस्ताव त्रुटी विरहित तसेच परिपूर्णरित्या सादर करण्याची कामगीरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश, सो, मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त सो. मा. श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री. प्रशांत अमृतकर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्रीमती. प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्रसिंह गौर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पोलीस हवालदार, सचिन चव्हाण, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी केली आहे.

( सुधीर हिरेमठ )
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),
पिंपरी चिंचवड